I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S. (पोलीस ठाणे):** बंडगार्डन **Year (वर्ष):** 2024

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0240 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/08/2024 17:34 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | 120-B |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | १६६ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | १६७ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | १७७ |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | १९३ |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |
| 7 | भारतीय दंड संहिता १८६० | ३४ |
| 8 | भारतीय दंड संहिता १८६० | २०३ |
| 9 | भारतीय दंड संहिता १८६० | २१९ |
| 10 | भारतीय दंड संहिता १८६० | २२० |
| 11 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६६ |
| 12 | भारतीय दंड संहिता १८६० | ४७४ |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 15/11/2020 **Date To (दिनांक पर्यंत):** 10/11/2022

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 00:01 तास **Time To (वेळेपर्यंत):** 00:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 27/08/2024 **Time (वेळ):** 17:07 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 025

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Date and Time (दिनांक आणि वेळ):** 27/08/2024 17:07 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** आग्नेय, 0.5 कि.मी.  **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** पोलीस आयुकत कार्यालय पुणे शहर ,

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

      **District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** निखील नंदकुमार पिंगळे

   (b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

   (c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1990  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

   (f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

   **Date of Issue (दिल्याची तारीख ):**  **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

   (g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
| --- | --- | --- |

   (h) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

   (i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पुणे शहर , बंडगार्डन, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस आयुक्त कार्यालय , पुणे शहर, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8308880400

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | भाग्यश्री नवटक्के | | | 1. सी/31,क्वींन्सगार्डन गुलमोहर,Town/Village (शहर / गाव): सरकारी अधिकारी काँटर्स,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): बंडगार्डन,District (जिल्हा): पुणे शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

बंडगार्डन पोलीस स्टेशन गु. र. नं 240/2024 भारतीय दंड संहिता 1860 , कलम 120 (ब ) ,166, 167,177,193,34,201,203,219,220,466,474,प्रमाणे
दाखल अधिकारी - निखील पिंगळे पोलीस उपआयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर
फिर्यादी नाव व पत्ता - निखील नंदकुमार पिंगळे वय 33वर्ष पोलीस उपआयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर मो. नं 8308880400 आधार क्र 629012734449 ईमेल आयडी nn.pingale@ips.gov.in
आरोपीचे नाव व पत्ता - भाग्यश्री नवटक्के वय 36वर्ष तत्कालीन पोलीस उपआयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर रा.सी/31, क्वींन्सगार्डन गुलमोहर सरकारी अधिकारी कॉटर्स
गु. घडला ता. वेळ व ठिकाण - दि. 15/11/2020 रोजी 00.01 ते 10/11/2022 00.00 वाजेपर्यंत पोलीस आयुकत कार्यालय पुणे शहर
विलंबाचे कारण – शासनाकडुन व पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन प्राप्त झालेल्या आदेशानंतर
थोडक्यात हकीकत - मी निखिल पिंगळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यालय समक्ष हजर राहुन शासन व पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन देण्यात आलेले निर्देशास अनुसरुन तसेच पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडील आदेश क्र.पोआ/वाचक/फिर्याद-आदेश/243/2024 दि. 27/08/2024 अन्वये आम्हाला सदर सरकारतर्फे फिर्याद देण्यास आदेशीत केले असुन आमची खालील प्रमाणे फिर्याद आहे.
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे स्वाक्षरीचे गोपनीय पत्र क्र.तक्रार-1924/प्र.क्र.74/ पोल-2, दिनांक 20/08/2024 जे पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई यांना अग्रेषित केले आहे. त्यामध्ये जळगाव येथील भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टिस्टेट को.ऑप.क्रेडीट सोसायटीबाबत नोव्हेंबर,2020 मध्ये पुणे जिल्हयात नोंद झालेल्या तीन गुन्हयांच्या अनुषंगाने अर्जदार श्री.सुनिल देवकीनंदन झंवर व श्री.कुणाल शहा यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी अहवालावरील कार्यवाही संदर्भात पोलीस महासंचालक कार्यालयाने दि. 19.03.2024 या पत्रान्वये अहवाल शासनास उचित कार्यवाहीसाठी पाठविला. यासंदर्भात श्री.अमिताभ गुप्ता, तत्का.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दि.08.05.2024, दि. 19.06.2024 व दि.12.08.2024 रोजीच्या पत्रान्वये, श्री.कृष्ण प्रकाश, तत्का. पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांनी दि. 14.05.2024 रोजीच्या पत्रान्वये, डॉ.अभिनव देशमुख, तत्का.पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी दि. 09.05.2024 व दि. 02.07.2024 रोजीच्या पत्रान्वये आणि श्रीमती भाग्यश्री नवटक्के, तत्का.पोलीस उपायुक्त,आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी दि. 28.06.2024 रोजीच्या पत्रान्वये खुलासे शासनास सादर केले असुन ते शासनाने विचारात घेतले. प्रस्तुत विषयांसंदर्भात उपरोक्त संबंधित अधिकारी यांचा सहभाग व त्यांच्या निर्णय प्रक्रियेबाबत संदर्भ क्र. 7 येथील पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. 10.08.2024 रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केला असुन पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मंुबई यांच्या सदर पत्रान्वये सादर केलेल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायाशी शासन सहमत आहे. सदरहु पत्रातील परिछेद क्र. 5 मध्ये पुढील प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

In order to uncover the whole truth, identify all those involved in abetting this conduct and most

importantly, ascertain the true motive for the action of these officials, the Home Department may continue to consider pursuance of a police investigation to bring the matter to its logical conclusion.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या उपरोक्त परिछेदाप्रमाणे कार्यवाही करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत असुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. शासनाचे सदर पत्र पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडुन विशेष पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था श्री. छेरिंग दोरजे यांचे स्वाक्षरीचे पत्र क्र.पोमसं/22/भाईचंद हिराचंद रायसोनी/पतसंस्था गुन्हे/231/2015, दि.20/08/2024 चे पत्रासोबत पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर प्राप्त पत्राचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात पोलीस तपास होणे करीता गुन्हा दाखल करणे क्रमप्राप्त असल्याने त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास शासनाचे दि. 20/08/2024 चे पत्रामध्ये नमुद असल्याप्रमाणे संदर्भ क्र. 1 ते 7 चे अहवाल / कागदपत्रांच्या प्रती तसेच सदरील प्रकरणात वरील निष्कर्षावर पोहचण्यासाठी निगडीत दस्तऐवज मिळणेकामी जा.क्र. पोआ/पुणे शहर/बीएचआर-पतसंस्था गुन्हे/57/2024, दि.21/08/2024 अन्वये विनंती करण्यात आली होती.

सदर पत्रास अनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासन पत्रात नमुद संदर्भिय पत्र व दस्तऐवज प्राप्त झाले. सदर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, विशिष्ठ बाबी समोर आल्याचे दिसुन येते. तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन प्राप्त दस्तऐवजातील गुन्हे अन्वेषण विभागाकडील चौकशी अहवालामध्ये खालील बाबी निष्पन्न होत असल्याचे नमुद आहे.

1. (1) आळंदी पोस्टे, पिंपरी चिंचवड गुरनं 306/2020, (2) डेक्कन पोस्टे, पुणे शहर गुरनं 673/2020 व (3) शिक्रापुर पोस्टे, पुणे ग्रामीण गुरनं 754/2020 असे तीन गुन्हे एकाच दिवशी एका पाठोपाठ एक असे तात्काळ दाखल झालेले आहेत. सदर गुन्हे दाखल होण्याची वेळ पहाता, सर्व गुन्हे दाखल करताना पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण या पोलीस घटकांमध्ये समन्वय साधुन कारवाई केली असल्याचे दिसुन येत आहे. तीनही गुन्हयांमध्ये जळगाव येथील छापा कारवाई संयुक्तरित्या केली आहे.

2. वर नमुद तीनही गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने प्राथमिक चौकशीची कार्यवाही त्रोटक झाली असल्याचे दिसुन येते. नमुद तीनही गुन्हयांमध्ये अर्जदार यांच्या तक्रार अर्जाचे प्राथमिक चौकशीचा अहवाल अभिलेखावर उपलब्ध नाही. आळंदी पोस्टे गुरनं 306/2020 हा गुन्हा दाखल करताना फिर्यादी श्रीमती मालती अविनाश साबळे या पोलीस ठाण्यात समक्ष हजर नव्हत्या तरी सुध्दा श्रीमती प्रेरणा कट्टे यांनी घाई गडबडीमध्ये गुन्हा दाखल केला आहे. डेक्कन पोस्टे गुरनं 673/2020 हा गुन्हा दाखल करताना फिर्यादी सौ.रंजना घोरपडे या पोलीस ठाण्यात समक्ष हजर नव्हत्या तरी सुध्दा गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये प्रचलित पध्दतीकडे दुर्लक्ष करुन घाईगडबडीने व कोणतातरी हेतु ठेवून हे गुन्हे दाखल केले अशा निष्कर्षास वाव आहे.

3. मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र. 713,714,715/2021 मध्ये दि. 24/07/2021 रोजी तत्कालीन पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर भाग्यश्री नवटके यांनी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये नमुद केलेल्या अजय ललवाणी, उदय कांकरिया, सुरेशकुमार बिकमचंद जैन व राजेश सुरेश जैन यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही.

4. आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी सदर गुन्हयामध्ये नियुक्त केलेले व्हॅल्युअर श्री. अंकलगी यांनी गुन्हयामध्ये नमुद केलेल्या मालमत्तांचे मुल्यांकन करताना नमुद मालमत्तांचे Distress Value विचारात घेण्यात आलेली नाही. सदरच्या मालमत्ता या भाईचंद हिराचंद रायसोनी या पतसंस्थेच्या अवसायनाच्या प्रक्रियेमध्ये लिलावामध्ये विक्री करण्यात आल्या आहेत ही बाब सुध्दा मुल्यांकन करताना विचारात घेण्यात आलेली नाही. श्री अंकलगी यांनी बीएचआर च्या ज्या मालमत्तेचे मुल्यांकन केलेले आहे ते मुल्यांकन हे इतर सर्व व्हॅल्युअर यांनी केलेल्या मुल्यांकनापेक्षा जास्त असल्याचे दिसुन आले आहे.

5. बीएचआर पतसंस्थेच्या ई-टेंडर मध्ये सहभागी होऊन दुकान क्र. 15 अवधुत आर्केड, आंबेगाव बु., पुणे 35.68 चौ.मि. क्षेत्रफळाची मालमत्ता खरेदी करणारे साई सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, बारामती यांनी मालमत्ता खरेदी केली आहे. व ती खरेदी करताना एकुण रक्कमेच्या 92.19 टक्के इतकी रक्क्म त्यांच्याच नावे असलेल्या ठेवपावत्यांच्या स्वरुपात दिलेली आहे असे नेहा फडके यांच्या फॉरन्सिक ऑडीट रिपोर्ट मध्ये नमुद आहे. मालमत्ता खरेदी केल्यानंतर ती मालमत्ता श्रीमती स्वाती कैलास साईनकर रा. पुणे यांना विक्री केली आहे. डेक्कन पोस्टे गुरनं 673/2020 या गुन्हयाचे दोषारोपपत्रामध्ये साई सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, बारामती व श्रीमती स्वाती कैलास साईनकर रा. पुणे यांना आरोपी केल्याचे दिसुन येत नाही.

6. मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र. 713,714,715/2021 मध्ये दि. 24/07/2021 रोजी तत्कालीन पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर भाग्यश्री नवटके यांनी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये शिक्रापुर पोस्टे येथे दाखल गुन्हयाची हकीकत नमुद करताना शिक्रापुर पोस्टे गुरनं 754/2020 या गुन्हयाच्या फिर्यादीमध्ये नमुद असलेला मजकुर नमुद केला आहे व त्या मजकुरामध्ये शेखर सोनाळकर यांनी ब-याच बेनामी पावत्या अवसायकामार्फत खात्यात जमा केल्या असल्याचे नमुद केले आहे. त्याबाबत शेखर सोनाळकर यांचेवर दोषारोपपत्र दाखल केले नाही.

7. विशेष सरकारी वकील श्री. प्रविण चव्हाण यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका क्रमांक 98/2011 मध्ये आरोपी श्री प्रमोद रायसोनी यांचे वकील म्हणून कामकाज पाहिले असताना त्यांची दाखल तीनही गुन्हयात विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्याबाबत शिफारस केली.

8. कोथरुड गुरनं 03/2021 या गुन्हयाचे तपासामध्ये दि. 09/01/2021 रोजी अर्जदार यांचे पुणे येथील निवासस्थानाचा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला असुन त्यामध्ये जप्त मुद्देमालाच्या यादी मध्ये अ.क्र.9 वर आसुस कंपनीचा एक लॅपटॉप व क्र. 10 वर डेल कंपनीचा एक लॅपटॉप जप्त केला असल्याचे दिसुन येते. सदर जप्त लॅपटाप ची डेक्कन पोस्टे गुरनं 673/2020 मध्ये तपास अधिकारी श्रीमती खोकले यांनी मागणी केली नाही. तसेच त्या लॅपटॉप च्या फॉरेन्सिक इमेजची करण्यात आलेल्या मागणी बाबत पाठपुरावा केला नाही. त्यामुळे सदर लॅपटॉप हेच बीएचआर ई-निविदा प्रक्रिये मध्ये निविदा भरण्याकरीता वापरण्यात आले किंवा कसे याबाबत पडताळणी केली नाही.

9. डेक्कन पोस्टे गुरनं 673/2020 या गुन्हयाचे कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता, सदर टिपणीच्या खरेपणावर सांशकता निर्माण होत आहे.

10. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन गृहविभागाने वर नमुद केलेल्या सबंधित अधिका-यांकडून आलेल्या उत्तरांची छाननी केली. तत्कालीन पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री.कृष्ण प्रकाश आणि

पुणे ग्रामीणचे तत्कालीन पोलीस अधीक्षक, डॉ.अभिनव देशमुख यांच्या जबाबावरुन सदर गुन्हे चुकीच्या पध्दतीने दाखल करण्यात पुणे शहर पोलीसांच्या तत्कालीन वरिष्ठ अधिका-यांची महत्वाची भुमिका असल्याचे उघड झाले आहे. सबंधित अधिकारी यांनी दिलेले खुलासे हे टाळाटाळ व दिशाभुल करणारे, विरोधाभासी आणि अत्यंत असमाधानकारक आहे. या अधिका-यांनी जाणूनबुजून कायद्याची पायमल्ली तर केलीच, शिवाय शेजारच्या कार्यक्षेत्रातील सबंधित अधिका-यांना प्रस्थापित कार्यपध्दतीचे उल्लंघन करण्यास भाग पाडले. या प्रक्रियेदरम्यान या अधिका-यांकडून सहकार्य व योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांच्या कडुन त्यांच्या वर्तणुकीबाबत सत्य जाणून घेण्यासाठी फौजदारी तपास आवश्यक आहे अशा निष्कर्षावर गृहविभाग आणि पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य हे पोहचलेले आहे.

एकंदरीत सदर प्रकरणात शासन व पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन देण्यात आलेले निर्देश, गुन्हे अन्वेषण विभागाकडुन झालेली चौकशी तसेच शासनाचे दि. 20/08/2024 चे पत्रातील संदर्भ क्र. 4 व 5 मधील प्राप्त खुलाशाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होत आहे की, दाखल तीनही गुन्हे हे तत्कालीन पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्रीमती भाग्यश्री नवटके व इतर यांनी कट रचुन तीन ठिकाणी एकापाठोपाठ एक 24 तासांच्या आत कोणताही सारासार विचार न करता, त्रोटक प्राथमिक चौकशी करुन दाखल केले आहे. त्यापैकी आळंदी व डेक्कन पोस्टे येथे गुन्हा दाखल करताना फिर्यादी हे समक्ष हजर नव्हते. दाखल तीनही गुन्हे हे रुपये तीन कोटी पेक्षा कमी फसवणूक रक्कमचे असताना देखील सदर गुन्हयाचा तपास प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब न करता आर्थिक गुन्हे शा

शाखेकडे घेण्यात आला. तसेच पुणे शहर आयुक्तालयाचे हद्दीबाहेर जाऊन एकाच ठिकाणी संयुक्त पथक पाठवून छापा कारवाई केली असे दिसुन येते. पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण या पोलीस घटकात दाखल असलेल्या गुन्हयाचे तपसामध्ये हस्तक्षेप व दबाव टाकून अवाजवीरित्याने गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. गुन्हे दाखल करण्यापुर्वी तक्रारदार हे जाणीवपुर्वक विशेष करुन पुणे व परिसरातीलच घेण्यात आले. सदर प्रकरणात निवडक आरोपी करणे, निवडक दोषारोपपत्र पाठविणे, गुन्हयाची व्याप्ती मोठी दाखविणे, हितसंबंधित (conflict of interest) व्यक्तीला विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करणे, गंभीर पुराव्याबद्दल हेतुपुरस्कर दुर्लक्ष करणे, कार्यालयीन टिपणीचे खोटेपणा करणे, अशा प्रकारचे वेगवेगळे कृत्य केल्याचे निष्पन्न होत आहे. सदर प्रकरणात शासन व पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन वरील प्रमाणे देण्यात आलेले निर्देश तसेच पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालय यंाचेकडुन प्राप्त प्रथम खबर अहवालाचा वरील प्रमाणेचा मसुदा व आदेशास अनुसरुन आमची शासनाचे आदेशानुसार तत्कालीन पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्रीमती भाग्यश्री नवटके व इतर यांचेविरुध्द भादंवि क. 34, 120(ब), 166, 167, 177, 193, 201, 203, 219, 220, 466, 474 अन्वये सरकारतर्फे फिर्याद आहे.

पुढील तपास – श्री .विवेक मासाळ पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे पुणे शहर मो. नं 7718076868

**13.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAVINDRA MANOHAR GAIKWAD (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAVINDRA MANOHAR GAIKWAD

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** POBN72854

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | 1988 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**